विभागीय वन अधिकारी,गट-अ (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्र. एमएफएस-२०१७/प्र.क्र९३/फ-८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २०१८

पहा :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांचे पत्र क्र. मवसे/निसू/विवअ/प्र.क्र.९/ १७-१८/१६९६/कक्ष-९ दि.८/०९/२०१७.

२) सामान्य प्रशासन विभागाची अधिसुचना क्र एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.-१५६/कार्या-१२ दि.२८/०४/२०१५, दि.१५/०६/२०१७.

३) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचा याचिका क्र.२७९७/२०१५ मधील दि.४/०८/२०१७ चा निर्णय.

४) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ अे/१६-ब, दि.२९/१२/२०१७.

शासन आदेश :-

वन विभागातील सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) (वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे- रू.५०००) या संवर्गातील ३१ अधिकाऱ्यांची विभागीय वन अधिकारी, गट-अ (वरिष्ठ श्रेणी) (वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे- रू.६६००) या संवर्गातील खुल्या प्रवर्गासाठी राखीव जागांवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नांव	मंजूर महसूली संवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	पदोन्नतीने प्रस्तावित पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५	६
१	कु. प्रियंका नवनाथ गंगावणे	औरंगाबाद	अ.जा. तथा खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, लातूर	रिक्त पदावर
२	श्रीमती स्नेहल बी. महानूर	नागपूर	खुला प्रवर्ग	प्रसिध्दी व माहिती अधिकारी, प्र.मु.व.सं. कार्यालय नागपूर	रिक्त पदावर
३	श्री.यशवंत श्रीरामजी बहाळे	अमरावती	इ.मा.व. तथा खुला प्रवर्ग	संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा	रिक्त पदावर
४	श्री.उदय चंद्रकांत ढगे	अमरावती	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, (योजना) यवतमाळ	रिक्त पदावर
५	श्री.सागर दत्ताकर्मा गवते	औरंगाबाद	वि.मा.प्र. तथा खुला प्रवर्ग	संचालक, वन प्रशिक्षण संस्था, जालना	रिक्त पदावर

६	श्री.हरिश्चंद्र सुभाष वाघमोडे	अमरावती	भ.ज.(क) तथा खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, (दक्षता) अमरावती	रिक्त पदावर
७	श्री.मोहन बाबुराव नाईकवाडी	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव-पूर्व नागपूर)	रिक्त पदावर
८	श्री.सचिन बापुराव कंद	औरंगाबाद	इ.मा.व. तथा खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (योजना) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद	रिक्त पदावर
९	कु. रेवती अनिल कुळकर्णी	अमरावती	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन) यवतमाळ.	रिक्त पदावर
१०	श्री.शतनिक श्यामसुंदंर (कसाब) भागवत	नागपूर	वि.मा.प्र. तथा खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प-२, चंद्रपूर	रिक्त पदावर
११	श्री.डी.जे. घाडगे	पुणे	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (संशोधन) पुणे	रिक्त पदावर
१२	श्री.आर.एम. विधाते	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, भंडारा	रिक्त पदावर
१३	श्री.डी.सी. चकोले	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (योजना) प्र.मु.व.सं. कार्यालय नागपूर	रिक्त पदावर
१४	श्री.आर.एम.बोऱ्हाडे	पुणे	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) पुणे	रिक्त पदावर
१५	श्री.ए.व्ही.बेडके	औरंगाबाद	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण उस्मानाबाद	रिक्त पदावर
१६	श्री.पी.आर.पाटील	नाशिक	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण,धुळे	रिक्त पदावर
१७	श्री.व्ही.व्ही.घाटे	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (सर्वेक्षण व संनियंत्रण) प्रमुवसं (वन्यजीव) नागपूर	रिक्त पदावर
१८	श्री.व्ही.के.सुर्वे	कोकण-१	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक), चिपळूण, रत्नागिरी	रिक्त पदावर
१९	श्री.एस.डब्ल्यू.नाईक	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (संरक्षण) प्र.मु.व.सं. कार्यालय नागपूर	रिक्त पदावर
२०	श्री.डी.व्ही.अमृतकर	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (डाटाबेस-का.आ) प्र.मु.व.सं. कार्यालय नागपूर	रिक्त पदावर

२१	श्री.जे.एस.देशमुख	पुणे	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (योजना) कोल्हापूर	रिक्त पदावर
२२	श्री.आर.बी.कुंभार	कोकण-२	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (वन्यजीव-२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली	रिक्त पदावर
२३	श्री.एस.जे.लचके	कोकण-२	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, ठाणे	रिक्त पदावर
२४	श्री.एस.ए.पार्डीकर	अमरावती	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, बुलढाणा	रिक्त पदावर
२५	श्री.पी.व्ही.जगत	औरंगाबाद	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, जालना	रिक्त पदावर
२६	श्री.एस.के.त्रिपाठी	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (वनसंवर्धन तज्ञ) नागपूर	रिक्त पदावर
२७	श्री.एस.एस.रनाळकर	नाशिक	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नाशिक	रिक्त पदावर
२८	श्री.डी.एस.घोलप	पुणे	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, पुणे	रिक्त पदावर
२९	श्री. बी.एच. पाटील	नाशिक	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, जळगांव	रिक्त पदावर
३०	श्री. डी.एस. क्षिरसागर	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन) चंद्रपूर.	रिक्त पदावर
३१	श्री. डी. एस. जोशी	नागपूर	खुला प्रवर्ग	विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) वर्धा.	श्री.राहूल गवई यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदांवर अन्य अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. तसेच श्री.राहूल गवई, विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) वर्धा यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहेत.

३. वर नमूद अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ/ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती देण्यात येत आहे :-

अ) पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका

क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग / १६ - ब यांनी दि.२९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनूसार मान्यता देण्यात येत आहे.

ब) वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

क) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाजेष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

ड) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/का-१२, दि.१५/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकाला निलंबित आहेत किंवा त्यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाहीच्या अनुषंगाने दोषारोप बजावून शिस्तभंग विषयक कार्यवाही चालू झालेली आहे किंवा या अधिकाऱ्यांविरूद्ध फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहेत अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणात विभागीय पदोन्नती समितीने त्यांची गोपनीय अभिलेखाच्या व इतर सेवाप्रवेश नियमाच्या तरतुदींच्या अनुषंगाने पात्रता तपासली असून या अधिकाऱ्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीने केलेले मुल्यमापन आणि दिलेली प्रतवारी स्वतंत्र पाकीटात मोहरबंद करून ठेवण्यात आली आहे.याबाबत प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

इ) सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती कोणतीही पुर्व सूचना वा नोटिस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

ई) सदर पदोन्नती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद तसेच मा.उच्च न्यायालय/ मा.सर्वोच्च न्यायालय इत्यादी ठिकाणी सहायक वनसंरक्षक या संवर्गातून अथवा विभागीय वन अधिकारी संवर्गातून जेष्ठतेबाबत काही दावे / याचिका दाखल केले असल्यास, सदर प्रलंबित याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

फ) सदर अधिकाऱ्यांची पदोन्नती ५०/५५ च्या वर्षाच्या पुर्नविलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहील.

४. सदर पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे / नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यमुक्त केल्यानंतर विहित मुदतीत ते नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.३०/०४/१९९१ व दि.१२/०९/२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच पदोन्नती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत विभागीय वन अधिकारी पदाचा १२/२४ वर्षाचा लाभ दिला असल्यास तो तात्काळ थांबविण्यात यावा व त्यांना विभागीय वन अधिकारी संवर्गात प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर सदरचा लाभ देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

५. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याने विभागीय वन अधिकारी या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर वेतन निश्चितीचा विकल्प तात्काळ द्यावा. असा विकल्प न दिल्यास, त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्र.११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

६. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

७. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०५३११७०७१९०११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d36 6233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650b ad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.06.01 15:15:02 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक /सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)
८) सर्व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण
९) सर्व उपवनसंरक्षक
१०) सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.-१२), मंत्रालय, मुंबई-३२
११) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१४) सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१५) संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) , म.रा.नागपूर यांचे मार्फत.
१६) निवड नस्ती (फ-८ कार्यासन)महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.